लोकमत

# व्यावसायिक अभ्यासक्रम अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या हिवाळी सत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे अर्ज भरण्यास दि. २३ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या मुदतीपर्यंत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये अर्ज भरावयाचे आहेत. शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी आणि इतर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. १३ डिसेंबरपर्यंत होती. मात्र, एस.टी. कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपामुळे काही विद्यार्थ्यांना या मुदतीमध्ये अर्ज भरता आलेले नाहीत.

पुढारी

# विद्यापीठांच्या सर्व परीक्षा यापुढे ऑफलाईनच : सामंत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना प्रादुर्भावामुळे विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाईन घेण्यात आल्या. परंतु आता परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर पुन्हा ऑफलाईन परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. महाविकास आघाडी सरकारचीही परीक्षा ऑफलाईन घेण्याचीच भूमिका आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी प्रदान समारंभानंतर सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी परीक्षा, वसतिगृह आणि शुल्काबाबत माहिती दिली. सामंत म्हणाले की, परीक्षा घेण्यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन, असे दोन्ही पर्याय दिले आहेत. जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतात. त्यांच्याशी चर्चा करून परीक्षांचे आयोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यापूर्वी कोरोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे विद्यापीठाच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेतल्या होत्या. विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळण्यासाठी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आल्या, असे म्हणणे योग्य नाही. राज्य सरकार कायमस्वरूपी ऑनलाईन परीक्षा घेणार आहे, असा गैरसमज कोणी पसरवत असतील, तर ते चुकीचे आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ परीक्षा अर्ज भरण्याची २३ डिसेंबरपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोंव्हेबर २०२१ च्या हिवाळी सत्रातील परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या तारखा व परीक्षा शुल्काबाबतचे परिपत्रक काढले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालय, अधिविभागात २३ डिसेंबरपर्यंत विनाविलंब परीक्षा अर्ज भरता येणार आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमाचे परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख १३ डिसेंबर होती. तथापि, राज्यात एस.टी. कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपामुळे व प्रथम वर्षाचे व थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया उशिरा झाल्याने काही विद्यार्थी अद्याप परीक्षा अर्ज भरू शकले नाहीत. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थी हितासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

पुढारी

# डॉ. प्रल्हाद माने समूह समन्वयक

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयातर्फे



आयोजित १६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रल्हाद माने यांची समूह समन्वयक व राष्ट्रीय परीक्षक म्हणून निवड झाली आहे. संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य यांनी निवडीबाबतचे पत्र पाठविले आहे. डॉ. माने यांच्या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अभिनंदन केले.

14 DEC 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराज कॉलेज, कस्तुरबा महाविद्यालयाला चॅम्पियनशिप

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कुस्ती

**इचलकरंजी : पुढारी वृत्तसेवा**

येथील व्यंकोबा कुस्ती मैदानावर शिवाजी विद्यापीठांतर्गत सन २०२१-२२ आंतरविभागीय कुस्ती स्पर्धा पार पडल्या. जयवंत महाविद्यालयातर्फे या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. यामध्ये फ्री स्टाईल कुस्तीमध्ये पुरुष विभागात गडहिंग्लजच्या शिवराज कॉलेजने बाजी मारली तर, महिला विभागात सांगलीच्या कस्तुरबा महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष पै. संभाजी वरुटे, उपमहाराष्ट्र केसरी पै. अमृत भोसले, प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील व स्पर्धेचे सचिव डॉ. एवन आवळे, विद्यापीठ निवड समितीचे अध्यक्ष प्रा. बाजीराव पाटील, डॉ. महेंद्र कदम, प्रा. विक्रम पाटील, पंच प्रमुख पै. संभाजी पाटील, डॉ. रतन नाईकनवरे, प्रा. आमीन बाणदार डॉ. माधुरी खोत यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण करण्यात आले.

या स्पर्धेत सांगली, सातारा, कोल्हापूर झोनमधून १८० पैलवानांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत फ्रीस्टाईल महिला व पुरुष, ग्रीको-रोमन पुरुष अशा विविध १० वजनी गटांत स्पर्धा झाल्या. प्रत्येक वजन गटात प्रथम आलेल्या पैलवानांची हरियाणातील भिवासी येथे होणाऱ्या अखिल भारतीय कुस्ती स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून पै. संभाजी पाटील, पै. राजाराम चौगुले, पै. बाबा शिरगावकर, पै. बापू लोखंडे, पै. बाळू मेटकर, पै. कृष्णात पाटील, पै. तानाजी पाटील, पै. सूरज मगदूम, पै. बाजीराव पाटील, पै. सतीश सूर्यवंशी आदींनी काम पाहिले.



**इचलकरंजी : येथे कुस्ती स्पर्धेच्या प्रारंभप्रसंगी पैलवानांसह पै. अमृत भोसले, पै. संभाजी वरुटे, प्राचार्य डॉ.प्रकाश पाटील.**

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : फ्री स्टाईल जनरल चॅम्पियनशिप महिला विभाग - कस्तुरबा कॉलेज, सांगली, सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूड, देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ग्रीकोरोमन जनरल चॅम्पियनशिप पुरुष विभाग अनुक्रमे - शिवराज कॉलेज, गडहिंग्लज, नाईट कॉलेज, इचलकरंजी, शहाजी कॉलेज.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या मुली : ५० किलो गट - नंदिनी साळुंखे (देवचंद, अर्जुननगर), ५३ किलो - स्वाती शिंदे (देवचंद, अर्जुननगर), ५५ किलो - विश्रांती पाटील (दत्त कॉलेज, वाकरे), ५७ किलो - अंजली पाटील व ५९ किलो - अंकिता आनंद शिंदे (सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूड), ६२ किलो - रुपाली माने (शहाजी कॉलेज, कोल्हापूर), ६५ किलो - वैष्णवी कदम (शिंदे महाविद्यालय, तिसंगी), ६८ किलो - वेदांतिका पवार (वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड), ७२ किलो - प्रतीक्षा बागडी (कस्तुरबा वालचंद कॉलेज, सांगली) व ७७ किलो - ऋतुजा संकपाळ (डी. आर. माने महाविद्यालय कागल).

मुले : विनायक रावण (दत्तद्वारका, वाकरे), विजय पाटील (लहू बाळा परिसेकर महाविद्यालय, पनोरे), कुलदीप पाटील (राधानगरी महाविद्यालय), अनिकेत पाटील (दे.भ.आनंदराव नाईक महाविद्यालय, चिखली), प्रथमेश गुरव (दे. भ. आनंदराव नाईक महाविद्यालय, चिखली), प्रतीक म्हेतर (राधानगरी महाविद्यालय), ऋषिकेश पाटील (ग. गो. जाधव महाविद्यालय, गगनबावडा), अतुल डावरे (दत्तद्वारका, वाकरे), अजय शेडगे (बाबा नाईक कॉलेज), अक्षय मंगवडे (श्रीपतराव चौगले महाविद्यालय कोतोली).

14 DEC 2021
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी सहायता केंद्राचे कार्य प्रेरणादायी

## प्रकाश शेंडगे : आजी-माजी विद्यार्थी कृती समिती संचालित केंद्रास सदिच्छा भेट

कोल्हापूर : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या विद्यार्थी सहायता केंद्राची कल्पना अभिनव आहे. राज्यातील इतर विद्यार्थी संघटनांसाठी शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी संघटनेचे कार्य प्रेरणादायी असल्याची भावना माजी आमदार प्रकाश शेंडगे यांनी व्यक्त केली. त्यांनी रविवारी शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती संचालित विद्यार्थी सहायता केंद्रास सदिच्छा भेट दिली. केंद्राच्या वतीने चालत असणाऱ्या कामांच्या प्रगतीचा आलेख पाहून त्यांनी कौतुक केले.

शेंडगे म्हणाले, राज्यातील अशा प्रकारचे हे पहिले सहायता केंद्र आहे. जे विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी सुरू केले आहे. त्याचा लाभ सर्वसामान्य विद्यार्थ्यांना होतो, हे समाधानकारक आहे. अशा प्रकारची केंद्रे राज्यातील सर्वच विद्यापीठांमध्ये होणे गरजेचे आहे.



**कोल्हापूर : माजी आमदार प्रकाश शेंडगे यांचे स्वागत करताना डॉ. प्रवीण कोडोलीकर. सोबत अन्य मान्यवर.**

डॉ. प्रवीण कोडोलीकर म्हणाले, माजी आमदार प्रकाश शेंडगे यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे अधिक बळ मिळाले आहे. पुढील काळात आणखी वेगाने सहायता केंद्राचे कार्य सुरू राहील.

यावेळी दि. बा. पाटील विमानतळ नामांतर लढ्याचे नेते जे. बी तांडेल, यशवंत सेना प्रमुख विवेक कोकरे, इकोबायोग्रीन प्रा. लि;चे संचालक डॉ. रोहित कोळेकर, ज्ञानज्योत प्रोडक्शनचे प्रा. डॉ. चांगदेव बंडगर, प्रवीण साळुंखे, अस्मिता जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

सकाळ

# राष्ट्रीय युवा संसदेसाठी डॉ. प्रल्हाद माने परीक्षक

## संसदीय कार्य मंत्रालयाकडून झाली निवड

**कोल्हापूर, ता. १३ :** केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी येथील डॉ. प्रल्हाद माने यांची समूह समन्वयक तसेच राष्ट्रीय परीक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. माने शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागात प्राध्यापक आहेत. संसदीय कार्य मंत्रालयाकडून त्यांची निवड झाली.

भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयाकडून देशभरातील विद्यापीठे व महाविद्यालयांमधून राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचे आयोजन केले जाते. या वर्षी होणाऱ्या १६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी डॉ. माने यांची निवड झाली. संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य यांनी या निवडीबाबतचे पत्र डॉ. माने यांना पाठविले. पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील जाधवपूर विद्यापीठ, कर्नाटकमधील मंगळूर विद्यापीठ, मध्यप्रदेशमधील इंदिरा गांधी केंद्रीय आदिवासी विद्यापीठ (अमरकंटक), स्वामी विवेकानंद विद्यापीठ (सागर), देवी अहिल्या होळकर विद्यापीठ (इंदोर) आणि उत्तर प्रदेश येथील दयालबाग शिक्षण संस्था (आग्रा) या सहा विद्यापीठांमध्ये संसद स्पर्धा आयोजित केली आहे. डॉ. माने शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचे समन्वयक आहेत. त्यांनी यापूर्वी विविध विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले आहे. सन २०१८ मध्ये डॉ. माने यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठाच्या युवा संसद संघाने राष्ट्रीय स्तरावरील विजेतेपद मिळवले आहे. डॉ. माने यांच्या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अभिनंदन केले.



**डॉ. प्रल्हाद माने**

तरुण भारत

# विद्यापीठाच्या परीक्षा ऑफलाईनच



प्रतिनिधी
पुणे

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाईन घेण्यात आल्या. मात्र, परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर पुन्हा ऑफलाईन परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. महाविकास आघाडी सरकारचीही हीच भूमिका आहे, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी येथे स्पष्ट केले. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) ऑफलाईन परीक्षा घेण्याबाबच्या कोणत्याही सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या नसून, परिपत्रक बनावट असल्याचेही त्यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी प्रदान समारंभानंतर सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यांनी परीक्षा, वसतिगृह आणि शुल्काबाबत माहिती दिली. ते म्हणाले, राज्यातील विद्यापीठांना परीक्षा घेण्यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन पर्याय दिले आहेत. जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतात. त्यांच्याशी चर्चा करून परीक्षांचे आयोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यापूर्वी कोरोनाने उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे विद्यापीठाच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या होत्या.

तरुण भारत



कोल्हापूर : माजी आमदार प्रकाश शेंडगे यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करताना डॉ. प्रविण कोडोलीकर. सोबत जे. बी. तंडेल, डॉ. रोहित कोळेकर.

# विद्यार्थी सहाय्यता केंद्रास माजी आमदार शेंडगे यांची सदिच्छा भेट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती संचलित विद्यार्थी सहाय्यता केंद्रास माजी आमदार प्रकाश शेंडगे यांनी सदिच्छा भेट दिली. केंद्राच्या वतीने चालत असणाऱ्या विद्यार्थी हिताच्या कार्याचे कौतुक केले. डॉ. प्रविण कोडोलीकर यांच्याबरोबर पुढील वाटचालीविषयी चर्चा केली. कृती समितीच्या वतीने पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकासात मोठे योगदान आहे. प्रत्येक अडचण सोडवून विद्यार्थ्यांना न्याय देण्याचे काम ही संघटना करते याचे मला समाधान आहे, असे गौरवोद्गार शेंडगे यांनी काढले. यावेळी दि. बा. पाटील, जे. बी तंडेल, यशवंत सेना प्रमुख विवेक कोकरे, डॉ. रोहित कोळेकर, डॉ. चांगदेव बंडगर, प्रविण साळुंखे, अस्मिता जोशी आदी उपस्थित होते.